# १२. प्रवास कचऱ्याचा

संत गाडगेबाबांचा स्वच्छतेविषयीचा पाठ तुम्ही अभ्यासला. एका शाळेतील इयत्ता तिसरीला शिकवणाऱ्या बाईंनी एक उपक्रम राबवला, तो वाचा.

तिसरीच्या वर्गातल्या मुलांनी एक आठवडा दररोज राबून शाळेचे मैदान, शाळेची मागची बाजू, सगळे वर्ग लख्ख केले होते. बाईंनी मुलांना कागदाचे तुकडे, पुठ्ठे, रद्दी पेपर, वाळलेले गवत एका डब्यात टाकायला सांगितले होते. फळांच्या साली, कोई, बिया दुसऱ्या डब्यात टाकायला सांगितल्या होत्या. 'असे का बरे ?' हा प्रश्न अनेक मुलांना पडला होता.

''फळांच्या साली काय अन् कागदाचे तुकडे काय, कचराच ना तो. वेगवेगळं टाकून त्याचं काय करायचं?'' नीलाने बाईंना विचारले.

''मला वाटलंच होतं की तुम्हांला हा प्रश्न पडणार.'' बाई म्हणाल्या.

''कचरा वेगवेगळा करण्याचं कारण आहे. प्रत्येक प्रकारच्या कचऱ्याचा प्रवास वेगवेगळा असतो.'' बाई म्हणाल्या.

''प्रवास ? कचऱ्याचा?'' मुलांना आश्चर्य वाटले.

''आपल्या परिसरातला कचरा डब्यात भरून ठेवला, तर पुढे त्याचं जे काही होतं तो त्याचा प्रवास. हे कागदाचे तुकडे, पुठ्ठे, वाळलेलं गवत – यांच्यापासून काय होतं, माहीत आहे का तुम्हांला? त्यांचा पुन्हा लगदा बनवून वेगवेगळ्या शोभेच्या वस्तू, डब्या, खेळणी, पेन–पेन्सिलींची खोकी असं काय काय बनवता येतं. तसंच त्याचा पुन्हा कागदही बनवता येऊ शकतो.'' बाई म्हणाल्या.

''किती घाण वास येतो या कचऱ्याचा.'' जयंत म्हणाला.

''अरे, जो वास आपल्याला घाण वाटतो, तो वास त्या कचऱ्यातून बाहेर पडणाऱ्या वायूचा असतो. असा वायू घरांमध्ये सरपणाऐवजी इंधन म्हणून वापरता येतो. या सडलेल्या कचऱ्याचं उत्तम खत बनवता येतं. शेतीसाठी असं खत अगदी उपयोगी असतं.'' बाईंनी समजावून सांगितले.

''म्हणजे, कचरा हा नुसता कचरा नाही, त्याचे अनेक उपयोग आहेत. खराब कागदापासून पुन्हा नवा कागद, शोभेच्या वस्तू – मजाच आहे की !'' मुले म्हणाली.

वेगवेगळा कचरा वेगवेगळ्या प्रवासाला जाणार म्हणून तो वेगवेगळाच ठेवायला हवा. सर्व मुलांनी ठरवले, की आपण आपल्या घरीसुद्धा असाच ओला व सुका कचरा वेगवेगळ्या डब्यांत ठेवायचा.

## स्वाध्याय

**प्र. १. तुमच्या घरातला कचरा नीट पाहा. त्यात काय काय असते याची यादी करा. हा कचरा वेगवेगळा करायचा असेल, तर कसा कराल ? कोणता कचरा कोणत्या डब्यात जाईल ते ठरवा. ज्या कचऱ्याविषयी ठरवता येणार नाही तो वेगळा ठेवा.**

**प्र. २. परिसर स्वच्छ करतो, तसे आपणही स्वच्छ राहायला हवे. स्वत:ला स्वच्छ ठेवण्यासाठी तुम्ही काय काय करता ते लिहा.**

**प्र. ३. खालील प्रसंग वाचा. यांतील मुलांकडे स्वच्छतेसाठी लागणाऱ्या काही आवश्यक गोष्टी नाहीत, पण स्वच्छता तर व्हायला हवी. ते काय करू शकतील, ते सुचवा.**

(अ) सुनीता मावशीकडे राहायला आली होती. सकाळी दात घासायला जाताना तिला आठवले, की तिचा ब्रश ती घरीच विसरून आलीय. ती आता दात कसे स्वच्छ करेल ?

(आ) जमील अंघोळ करत होता. दोन तांबे पाणी ओतले अन् त्याच्या लक्षात आले, की साबण संपलेला आहे. आता जमीलला स्वच्छ होण्यासाठी काय करता येईल ?

(इ) रोहित सकाळी उठला. संडासला जाऊन आला. हात धुवायला साबणच नव्हता. आता तो हात कसे स्वच्छ करेल ?

(ई) नखांमध्ये घाण साचून राहते, म्हणून सरांनी नखे कापून यायला सांगितले होते; पण अंबूच्या घरात नेलकटर नव्हते. तिला नखे कापण्यासाठी काय करावे लागेल ?

**वाचा.**

शाळेतील, घरातील कचरा वाहून नेण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत) व्यवस्था करत असतात. त्यासाठी काही ठिकाणी घंटागाड्यांची व्यवस्था असते. त्यामध्ये सुका कचरा, ओला कचरा असे भाग असतात. त्यासाठी आपण शाळेत आणि घरी ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळा साठवला पाहिजे.

- **वाचा व वर्गीकरण करा.**

केळ्यांच्या साली, कागद, शिळे अन्न, खरकटे, फुटका कप, सडलेली फळे, तुटके पेन, कॅरीबॅग, खराब वहीचा पुठ्ठा, पालेभाज्यांची देठे, फळांच्या साली, तुटकी खेळणी.

**शिक्षकांसाठी :** वैयक्तिक स्वच्छतेसाठी बाजारातल्या महागड्या वस्तूंची गरज असतेच असे नाही, अशी चर्चा मुलांसोबत करता येईल. प्रश्न ३ मधील प्रश्नांना एकच उत्तर 'बरोबर' असेल असे नाही. तसा आग्रह धरू नये.